।। अल्पारंभ: क्षेमकर:।।

SINGLE WINDOW SERVICES

# गवाक्ष

......एक विचारमंच !

अंक १३ वा मार्च २००८


## गुंतवणूकदारांसाठी सूचना

आपण गुंतवणूक ही नेहमी दिर्घकालीन हेतू ठेवून करीत असतो. त्यामुळेच ती करतांना, संबंधित गोष्टी काळजीपूर्वक पडताळून घेऊनच गुंतवणूक करणे हितकारक ठरते. असे केल्याने गुंतवणूकदार व आर्थिक सल्लागार या दोघांचेही काम सुलभ होते. तेव्हा गुंतवणूक करतेवेळी कोणकोणत्या महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेतली गेली पाहिजे ते पाहू –

१. गुंतवणूक करणारी व्यक्ती सज्ञान पाहिजे म्हणजेच ती व्यक्ती १८ वर्षाच्या आत नसावी, विकृतचित्त/वेडी नसावी. जर गुंतवणूक अज्ञान व्यक्तीच्या नावाने करायची असेल तर पालककर्ता म्हणून कुणी तरी सज्ञान व्यक्तीने गुंतवणूक करावी.

२. गुंतवणूक करणारी व्यक्ती, गुंतवणूकीतील हेतू योग्य रितीने समजावून घेऊन आपल्या दृष्टीने निर्णय घेऊ शकते.
उदा. गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधीत योजनेचे फायदे, तोटे संपूर्णपणे समजावून घेऊन खात्री झाल्यानंतर गुंतवणूक करावी, समजा न समजल्यामुळे तुम्ही कोणत्याही योजनेत गुंतवणूक केली, व नंतर तोटा झाला तर त्यास अभिकर्ता जबाबदार राहत नाही.

३. गुंतवणूकीशी संबंधित असलेल्या योजनेत गुंतवणूक करण्याचे ठरल्यानंतर संबंधीत गुंतवणूक करण्यापूर्वी स्वत:ची आवश्यक ती माहिती दिली पाहिजे.
उदा. नाव : गुंतवणूक करण्याकरिता गुंतवणूकदारांना जे फॉर्मस् दिले जातात त्यात गुंतवणूकदाराने स्वत:चे नाव बरोबर लिहले आहे की नाही हे तपासून पाहिले पाहिजे, बऱ्याच वेळेस चुकीने वडिलांचे नाव आधी लिहले गेलेले असते, असे गोंधळ टाळण्याकरिता गुंतवणूकदाराने नाव, पत्ता, पॅन कार्ड क्र., वय यांची त्या अनुषंगाने लागणारी संपूर्ण खरी माहिती देणे गरजेचे आहे. नावात स्पेलिंगचा वेगळेपणा यायला नको. नाही तर फॉर्मस् एकत्रीकरणाला (Merging) ला खूप अडचणी येतात.

४. चुकीची, अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती गुंतवणूकदाराने दिल्यास आणि त्यामुळे काही नुकसान झाल्यास अभिकर्ता जबाबदार राहत नाही.
उदा. बऱ्याच वेळेस गुंतवणूक करण्याआधी संपूर्ण रकमेचा तपशील किंवा किती कालावधीसाठी गुंतवणूक करायची आहे असे प्रश्न विचारल्यानंतर, विचार न करता रक्कम व कालावधी सांगितल्यामुळे जर ती रक्कम अश्या एखाद्या योजनेत टाकली असेल, ज्यातून गुंतवणूकदार ती रक्कम काढू शकत नाही व ती रक्कम गुंतवणूकदाराला आवश्यकतेनुसार पाहिजे असते, तेव्हा मिळू शकत नाही. अश्या वेळेस अभिकर्ता काहीही करू शकत नाही.

५. गुंतवणूक निश्चितपणे होण्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे विहीत वेळेत द्यावीत, ऐनवेळेस कागदपत्रे देऊन, अगर अर्धवट कागदपत्रे दिल्यामुळे गुंतवणूक होऊ न शकल्यास त्यास संपूर्णपणे गुंतवणूकदार जबाबदार असतो.

६. अभिकर्त्यामार्फत एखाद्या विशिष्ट योजनेत गुंतवणूक केली म्हणजे त्याने सदर योजनेतून नफा होण्याची हमी दिली असे समजण्यात येऊ नये. गुंतवणूकदार संपूर्णपणे स्वत:च्या जबाबदारीवर, गुंतवणूकीतील धोके समजून, गुंतवणूक करीत असतो, यांची नोंद घ्यावी.

७. गुंतवणूकदाराने ज्या वेळेस गुंतवणूक करावयाचे ठरविले तेव्हा एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी निश्चित काळ निर्दिष्ट केला असेल तर त्या वेळेत ती पूर्ण केली पाहिजे, तसेच अभिकर्ता व गुंतवणूकदारांमध्ये जी वचने ज्या क्रमाने पाळावयाची ठरली असतील त्या क्रमानुसार पाळली पाहिजेत.

८. अभिकर्त्याने गुंतवणूकदाराला प्रत्येक गोष्टीची माहिती देण्याचा प्रयत्न केला परंतु गुंतवणूकदाराने ती गोष्ट पूर्ण करायची कृतीच केली नाही आणि काही नुकसान झाल्यास त्यास अभिकर्ता जबाबदार राहत नाही.
उदा. समजा एखादी गुंतवणूकदाराने एल.आय.सी. ची विमा पॉलीसी काढली व त्याचे प्रिमीयम भरण्याकरिता वेळोवेळी सांगून ही प्रिमीयम भरले गेले नाही, आणि अपघात घडून विम्याचे पैसे मिळू शकले नाही तर या गोष्टीला अभिकर्ता जबाबदार राहत नाही.

९. गुंतवणूकदाराने गुंतवणूक करण्यापूर्वी योजनेचा उद्देश आणि योजनेतून काय फायदा होऊ शकेल यांची अगोदरच खातरजमा करून घ्यावी.

१०. गुंतवणूकदाराने गुंतवणूक करतांना संबंधित कंपनीचे फॉर्मस् पूर्णपणे भरून, त्या मध्ये पीन कोड, मायकर कोड, मोड ऑफ होल्डिंग, सिग्नेचर ह्या गोष्टी नीट पडताळून घेतल्या पाहिजे. फॉर्मस्मधले सगळे कॉलम पूर्णपणे भरले पाहिजेत, जिथे काही लिहिण्याची आवश्यकता नसते तिथे एन.ए. (N.A.) असे लिहिले पाहिजे.
उदा. समजा फॉर्मस् च्या कॉलम मध्ये मोड ऑफ होल्डिंग आहे व त्यात १)सिंगल, २) जॉईंट, ३) एनी वन ऑर सर्वाइव्हर असे पर्याय दिलेले आहेत तर त्यातील नेमका कोणता पर्याय हवा आहे हे नीट पाहूनच तो पर्याय भरला पाहिजे.

फॉर्मस् मध्ये नॉमिनी कोणाला करावयाचे आहे हाही कॉलम असतो त्यात विचारपूर्वक काळजी घेऊन माहिती भरावयास हवी म्हणजे भविष्यात अडचणी येत नाहीत.

फॉर्मस्मध्ये सगळ्या ठिकाणी एकाच प्रकारची स्वाक्षरी असली पाहिजे. वेग-वेगळी स्वाक्षरी केल्यास ती न जुळल्यामुळे बऱ्याच अडचणी उद्भवू शकतात. तेव्हा

गुंतवणूकदाराने दक्षता घ्यावी.
जर गुंतवणूकदाराला एखाद्या व्यक्तीचे मुखत्यारपत्र घ्यावयाचे असेल तर त्याची स्वाक्षरी गुंतवणूक करतेवेळेसच् फॉर्म वर करून घ्यावी.

११. कोणत्याही योजनेत गुंतवणूक करताना त्या साठी जे पोस्ट डेटेड (पुढच्या तारखेचे) चेक दिले जातात, त्यांच्यावरच्या तारखा तपासून घ्याव्या व दिलेल्या तारखांच्या चेकच्या रकमेप्रमाणे तशी तरतूद बँकेत आधीच करून ठेवावी म्हणजे चेक बाऊंन्स होण्याचे धोके टळतात.

१२. जर गुंतवणूकदार अज्ञान असेल तर फॉर्मसमध्ये पालकाचे (गार्डीयनचे) नाव बरोबर दिले गेले पाहिजे.

१३. गुंतवणूक योजना ज्या संस्थेने बाजारात आणली आहे. त्या संस्थेबाबत कोणतीही हमी अभिकर्ता देत नाही. गुंतवणूक करण्यापूर्वी त्या बाबतची खात्री गुंतवणूकदाराने करून घ्यावी.
अशा तऱ्हेने वरील सर्वच गोष्टींची काळजीपूर्वक पडताळणी करून नंतरच गुंतवणूक केल्यास, आपले गुंतवणूक उद्दिष्ट साध्य होण्यास निश्चितच मदत होईल.

अनुवादित लेख

# तिळगूळ व हळदीकुंकू

पूर्वकाळातील समाजधूरिणांनी समाज एकसंघ रहावा, परस्पर मैत्री नाही तरी सलोखा व संवाद रहावा म्हणून अनेक प्रथा निर्माण केल्या. व्रतवैकल्ये, विविध सण, विविध उत्सव, जयंत्या व जत्रा यांचे आयोजन करून समाजात व कुटुंबात अभिसरण होईल असा प्रयत्न केला. लग्न, मुंजीतही असाच उद्देश शोधला तर वावगे ठरू नये. परस्परांना शुभेच्छादर्शक निरोप, पत्रे, भेटी (आताचे एस.एम.एस.) देत राहिल्याने नाते टिकते. संवाद राहतो. अडचणीच्या वेळी संतुलन राहते. आपलेपणाचा आधार हे सारे घडवितो. 'शेवटी माणूस एकटा आहे.' या चिरंतन सत्याला झाकोळून टाकणारी ही एकात्मतेची भावना माणसाला जगण्याचे बल देते. या सामर्थ्यामुळे अपयश, निराशा, वैर, दुरावा, तेढ, स्पर्धा यांना हादरा बसतो व अनेक अडथळ्यांना साथ करीत झुळझुळ वाहणाऱ्या निर्झराप्रमाणे जीवन प्रवाही व प्रभावी होते. संक्रांतीचा तीळगूळ व हळदीकुंकू हा असाच उभारी देणारा सण आहे. त्याने माणसे सुखावतात.पण या औपचारितकेला सहजतेने जर स्पर्श केला तर अनेक नात्यांना अर्थ येतो. नुसते 'गोड बोला' म्हणून कुणी तसे करीत नाही. ती फक्त सुरूवात असते, एक दिशा असते. एक आवाहन असते. मंदिराच्या समोरची पाहिली पायरी असते. खरे दर्शन तर पुढचे असते. आणि तो लाभ तेव्हाच होतो जेव्हा मन निर्मळ असते, उद्देश सहजतेने भारलेला असतो. हळदी कुंकवाचेही तसेच. हे सौभाग्यलेणे सर्वांनाच हवेहवेसे वाटते. धारण करणारी व पाहणारी व्यक्ती या दोघांनाही ती एका वेगळ्या पातळीवर नेते. ती पातळी असते सुखसमाधानाची. सार्थकतेची आणि म्हणूनच हवीहवीशी.

# जीवन विमा जाणून घ्या तुमचा क्लेम / हक्क

''तुमच्या कुटुंबासाठी सुयोग्य रकमेचा विमा उतरविणे केवळ पर्याप्त नाही तर नामांकन प्रदान केलेल्या व्यक्तीस क्लेम दाखल करण्याच्या पद्धतीसंबंधी सजग करणे हेही तितकेच महत्त्वपूर्ण आहे.''

मृत्यू हे अंतिम सत्य आहे ह्याची रास्त जाणीव असलेली व्यक्ती जिवन विमा उतरविण्यास उद्युक्त होते ती केवळ स्वत:विषयी विचार न करता मागे राहणाऱ्या आपल्या आप्तासाठीच. जिवन विमा हा साधारणपणे सुलभ वाटतो. विमा पॉलीसीमध्ये नामांकन नोंदविलेल्या व्यक्तीस पॉलीसी धारकाच्या निधनानंतर विम्याच्या रकमेचा लाभ प्राप्त होतो, तो अर्थात क्लेम दाखल केल्यावर. म्हणूनच पर्याप्त रकमेचा विमा आपल्या कुटुंबासाठी उतरविणे पुरेसे नाही, तर नामांकन प्रदान केलेल्या व्यक्तीस विमा पॉलीसीची विमा रक्कम प्राप्त होण्यासाठी त्याने विमा कंपनीकडे क्लेम प्रक्रीयेविषयी दाखल करावयाच्या पद्धतीची सुयोग्य माहिती करून देणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

७५ वर्षेवयाच्या सीता काश्यप याचे उदाहरण आपण पाहू या.

त्यांच्या पतीच्या अकाली झालेल्या मृत्युमुळे त्यांच्या कुटुंबाची केवळ दुर्दशा झाली नाही तर त्यांच्या नवीन घराच्या कर्जाचे भरावयाचे हप्ते कसे भरणार हे संकट निर्माण झाले.

श्रीमती काश्यप ह्या विमा पॉलसीचे पैसे परत मिळण्यासाठी विमा कंपनीकडे दाखल करावयाच्या क्लेम संबंधीच्या कार्यपद्धतीविषयी पूर्णपणे अनभिज्ञ होत्या तसेच ज्या विमाअभिकर्त्याकडून त्यांच्या पतीने पॉलीसी काढलेली होती, तो अभिकर्ता अन्यत्र निघून गेल्याने त्यांना त्यांच्या पतीच्या विमा पॉलीसीचे पैसे मिळण्यासाठी कित्येक महिन्यांचा कालावधी लागला. ह्याच पद्धतीची अनेक प्रकरणे सर्व साधारणपणे निदर्शनास येतात, असे विमा व्यावसायातील जाणकार व्यक्तींचे ठाम मत आहे. त्यांचे मते आपल्या भारत देशाच्या संदर्भात तर विमा पॉलीसीच्या क्लेमचा अंतिम निर्णय होण्याची प्रक्रिया ही अत्यंत क्लिष्ट तर आहेच पण ती पार पाडणे हे अधिकच खडतर काम आहे. सर्वसाधारणपणे बऱ्याच प्रकरणात उघडकीस येते की एकदा का विमा धारकाची पॉलीसी उतरविली की, अभिकर्ता पुन्हा पॉलीसी धारकाकडे फिरकत नाही. या पार्श्वभूमीवर विकसित देशांत मात्र क्लेम प्रक्रियेचे क्लिष्ट काम करण्यासाठी विमा क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती सहज उपलब्ध असतात.

विमा पॉलीसीच्या क्लेमचे कठीण काम नामांकन प्राप्त व्यक्ती आपल्या आयुष्यांत प्रथमच पण अंतिम अशा परिस्थितीत करीत असल्याने त्यास विमा कंपनीस सादर करावयाच्या दस्तावेजाची पूर्तता करणे, ती कागदपत्रे पूर्णपणे बिनचूक भरणे या प्राथमिक बाबी पासून अडचणींना तोंड द्यावे लागते.

सद्य स्थितीत विमा कंपन्या आपल्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करून क्लेम परतावा प्रक्रीया सुलभ करण्याच्या

दिशेने जाणीवपूर्वक पावले उचलित आहेत. क्लेम प्रक्रीया दाखल करण्याची पद्धती ग्राहकाभिमुख करण्यात आलेली आहे. सध्या क्लेम परताव्याविषयीची सूचना दूरध्वनीद्वारे अथवा ई–मेल द्वारे आपण ग्राहक लाभ कक्षास अथवा विमा कंपनीस देऊ शकता. जेणेकरून ग्राहक कक्ष प्रतिनिधी अथवा अन्य संबंधित अधिकारी आपणास क्लेम प्रक्रीये संबंधात सुयोग्य मार्गदर्शन करू शकेल. विमा धारकाच्या मृत्यूच्या संबंधीत, क्लेम परतावा प्रक्रीया ही मुख्यत्वे कायदेशीर प्रक्रीया संबोधली जाते.

सर्व विमा कंपन्या सर्व साधारणपणे क्लेम परतावा दाखल करतेवेळी लाभधारकाकडे काही महत्त्वूपर्ण दस्तावेजाची मागणी करतात. त्यामध्ये प्रामुख्याने लाभधारकाचे लिखित निवेदन, ज्यामध्ये मृत विमाधारक व लाभधारक या विषयीची माहिती, विमा धारकाच्या मृत्यूचा दाखला (जो अधिकृत अधिकारी व्यक्तीने दिलेला असणे गरजेचे असते) व विमा पॉलीसीची मूळ प्रत इ. मुलभूत, महत्त्वपूर्ण कागदपत्रांचा समावेश असतो. विमा धारकाच्या मृत्यूची सूचना प्राप्त होताच अत्यावश्यक बाबींची नोंद विमा पॉलीसीवर केली जाते. विमा धारकाच्या मृत्यूची सूचना विमा कंपनीस वेळीच देण्याची खबरदारी घेणे ही अत्यंत महत्त्वपूर्ण बाब, लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

वरील परिच्छेदात निर्देशित केलेले दस्तावेज, विमा कंपनीस सादर केल्यावर व ते विमा कंपनीस प्राप्त होताच विमा कंपनी कागद पत्राची सत्यता पडताळून पाहण्याची प्रक्रीया सुरू करते. सर्व कागदपत्रे नियमित असल्यास क्लेम परतावा साधारणपणे १० ते २० दिवसाच्या कालावधीमध्ये मिळण्याची शक्यता असते.

कित्येक वेळा विमा कंपनीकडून मागणी केलेल्या दस्तावेजाची यादी बघताच नामांकन प्राप्त व्यक्ती गर्भगळीत होते. कित्येक व्यक्ती विमा कंपनीने मागणी केलेली कागदपत्रे दाखल करावयास टाळाटाळ करतात. अपूर्ण असतांना दाखल केलेली कागदपत्रे क्लेम परतावा प्राप्त होण्यास विलंब कारक ठरतात.

नैसर्गिक मृत्यूच्या प्रकरणातील क्लेम परतावा प्रक्रीया अत्यंत साधी, सोपी, सरळ असते. पण तीच प्रक्रीया अनैसर्गिक मृत्युच्या प्रकरणात क्लिष्ट ठरते. विमा धारकाच्या अनैसर्गिक मृत्यूचे कारण नैसर्गिक मृत्यू अथवा दिर्घ आजाराने मृत्यू ह्या खेरीज अन्य काहीही असू शकते. आणि म्हणूनच क्लेम परताव्यासाठी नेहमीपेक्षा अधिक दस्तावेज सादर करण्याची गरज असते.

लाभधारकाच्या संदर्भात, विमा धारकाच्या मृत्यू संबंधित क्लेम परतावा प्रक्रीया तात्काळ व सर्वसाधारण क्लेम ही सारखीच असतात तथापि तात्काळ क्लेम संबंधात काही अधिक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक बनते. उदाहरणार्थ विमाधारकावर इलाज करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून अथवा कौटुंबिक डॉक्टरकडून काही अधिक विवरणपत्रे भरून घेणे, दवाखान्याचे नोंदणीपत्र दाखल करणे इ.

सर्वसाधारणपणे तात्काळ क्लेम परताव्याच्या प्रकरणात वरील बाबतीत तपास करण्याचा अधिकार विमा कंपनीस प्रदान केलेला असतो.

''तात्काळ क्लेम'' हा सर्वसाधारणपणे विमा धारकाने पॉलीसी घेतल्यापासून २ वर्षाच्या आत विमा धारकाचा मृत्यू होणे, ह्या प्रकारात गणला जातो व तो अनैसर्गिक मृत्यू या सदरातील प्रकार असल्याचे गृहित धरण्यात येते.

तात्काळ मृत्यू क्लेम परतावा प्रकरणांत त्यामुळे लाभधारकास त्रासदायक अशा तपास प्रक्रीयेस व कायदेशीर कागदपत्राची पूर्तता करण्याच्या दिव्यास सामोरे जावे लागते.

कित्येक वेळा लाभधारकास, काही कायदेशीर महत्त्वपूर्ण दस्तावेज दाखल करणे केवळ कठीण नव्हे तर अशक्यच असते. अशा वेळी विमा कंपनी ही हरप्रकारे लाभधारकास क्लेम परतावा साध्य होऊ नये म्हणून प्रयत्नशील असते. म्हणूनच लाभधारकाने विमा कंपनीने मागणी केलेल्या सर्व वैधानिक कागदपत्रांची पूर्तता करणे हितकारक व आवश्यक असते.

प्रारंभीच महितीचा अहवाल, शल्य चिकित्सेचा अहवाल, पोलीस चौकशीचा अहवाल व पंचनामा ह्या सारख्या महत्त्वपूर्ण दस्तावेजाची मागणी होताच पुर्तता केल्यास क्लेम प्रक्रीया सुलभ होऊ शकते.

वर वर्णिलेल्या बाबीं खेरीज विमा पॉलीसी धारकाने आपल्या आवडत्या व्यक्तींची भविष्यातील अनपेक्षीत गोष्टी संबंधी मानसिक तयारी करवून घेणे त्याचप्रमाणे लाभधारक अथवा नामांकन प्रदान केलेल्या व्यक्ती संबंधातील संपूर्ण तपशिलाची पॉलीसीच्या कागदपत्रांसोबत नोंद ठेवणे आवश्यक ठरते.

विमा पॉलीसी धारकाने विमा पॉलीसी उतरविते वेळीच वेळोवेळी नामांकन कायम असल्याची खात्री करून घेणे आवश्यक ठरते.

विमा हा पूर्णतया विश्वासाच्या पायावर आधारीत असलेला करार असल्याने संपूर्णपणे सत्य व परिपूर्ण माहिती अर्ज दाखल करण्याचे वेळीच पुरविणे हितकारक होते. विमा पॉलीसीचा दस्तावेज व त्या संबंधित विमा कपंनीशी वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार लाभधारकास अथवा नामांकन प्रदान केलेल्या व्यक्तीस ज्ञात असावा तसेच सहजगत्या प्राप्त होईल अशा रितीने एकत्रितपणे सुरक्षित ठिकाणी ठेवावा.

**क्लेम विषयीची कांही महत्त्वपूर्ण अंगे : –**

१. विमा धारकाच्या मृत्यूची घटना विमा कंपनीस तात्काळ कळविणे.

२. नगरपालिका / महानगर पालिकेच्या अधिकृत पदाधिकाऱ्याने दिलेला मृत्यूचा दाखला प्राप्त करणे.

३. विमा कंपनीच्या शाखेमध्ये क्लेम परतावा संबंधित दस्तावेज दाखल केल्याबद्दलचे पोहोच पावती त्या शाखेच्या अधिकृत अधिकाऱ्याकडून प्राप्त करणे.

४. लाभधारकाचे आपल्या स्वत:बद्दलचे माहितीचे तसेच मृत विमा धारकाच्या माहिती संबंधित निवेदन पत्रक तयार

करणे.

५. विमा पॉलीसीसत्य प्रत, मूळ प्रत ताब्यात असणे व योग्य वेळी क्लेम साठी सत्य दाखल करणे.

६. विमा पॉलीसी विवाहित महिला मालमत्ता कायद्या अंतर्गत काढलेली असल्यास, नामांकन नोंदविलेले नसल्यास अथवा पॉलीसी असाईन केलेली असल्यास मृत व्यक्तीच्या मालमत्तेसंबंधीचा पुरावा दाखल करणे.

मृत्यू हा अटळ आहे व त्यास आपणांस केव्हातरी सामोरे जावेच लागणार आहे ही कल्पनाच आपली मृत्यूविषयी भिती दूर करण्यास साह्यभूत ठरेल व आपल्या आप्त इष्टांना जिवन विम्याविषयी वेळीच जागरूक केल्यास, मृत्युच्या घटनेने हतबल झालेल्या आपल्या आप्तेष्ठांना शांतता व सौख्याची तरी निदान प्राप्ती होईल.

अनवादित लेख

**अनुवाद श्री. पी. ए. कुलकर्णी**

## सुभाषितरत्नानि

अध: अध: पश्यताम् केषां महिमा न उपचीयते ।
उपरि उपरि पश्यन्त: सर्वेएव दरिद्रति ।।

आपल्या खाली खाली पहाणाऱ्या कोणाचे मोठेपण वाढत नाही बरे ? वर वर पाहणाऱ्या सर्वांनाच आपण दरिद्री आहोत (खालच्या थरावर आहोत) असे वाटते.

आपणापेक्षा कमी असलेल्या लोकांकडे पहावे म्हणजे आपण मोठे आहोत असे वाटते, व समाधान वाटते. आपणाकडून अधिक श्रीमंत असणारांकडे पहाणारांना आपण दरिद्री आहोत असे वाटून ते असमाधानी होतात. आपल्यापेक्षा अधिक दु:खी लोक जगात आहेत, त्यांचा विचार करावा म्हणजे आपले दु:ख कमी आहे, असे वाटेल.

सौ.

## गप्पा आजोबांशी : पुस्तक परिक्षण

समाजात समाधान व स्वास्थ्य नांदावे या हेतूने सुरू झालेली 'मुक्तांगण' ही एक चळवळ आहे, व्यासपीठ आहे, कृतीशील जीवनपद्धतीचे. मुक्तांगणचे आयुष्य तसे फार नाही पण जाण असलेले लहानही महानतेच्या यशोमंदीराच्या पायऱ्या आत्मविश्वासाने चढू शकतात याचे प्रतिक म्हणून 'गप्पा आजोबांशी' या छोटेखानी पुस्तकाकडे पाहता येईल.

बऱ्याच सुजाण वाचकांना माहित आहे की मौज प्रकाशनाचे श्री.पु. भागवत असे प्रकाशक होते की अनेक नवोदित, कसदार साहित्य देऊ शकणारे प्रतिभावान कवी व लेखक यांना त्यांनी लिहिते केले व पुस्तक रूपी अनेक रत्ने वाचकांच्या प्रशंसेस पात्र ठरली. श्री. बा. ल. शुक्ल या अनुभवसिद्ध व भाषेच्या गोडव्यावर प्रभुत्त्व असणाऱ्या लेखकाने आपले नियतकालिक 'गवाक्ष' यासाठी आधी सदर व आतां पुस्तकरूपाने एक संस्कार कलश आपल्या हाती दिला आहे. खरे म्हणजे शिक्षक, पालक समाजसेवक, युवा शिबीरे, साहसी प्रदभ्रमण, गिरीभ्रमण, वनविहार, जलविहार इ. आयोजित करणाऱ्या संघटकांनी हे व अशी पुस्तके तरूणांना आपले जीवन अधिक आनंददायी बनविण्यासाठी तसेच संबंधीत सुधारणा करून जीवन अधिक नियमित, स्वावलंबी व आत्मविश्वासाने भरलेले आहे, याची प्रचिती येण्यासाठी वापरावीत.

या पुस्तकाचे मुखपृष्ठही बोलके आहे. आजोबा गर्भश्रीमंत, सुटबुटातले वा उच्चपदस्थ नाहीत. ते आहेत एक सर्वसाधारण पालकांचे प्रतिनिधी. नात मात्र आपले नवेपण जपणारी तरी आजोबांशी भावनेने जोडलेली वाटते. घरात मनमोकळेपणा व आनंद वाढण्यासाठी आर्थिक दर्जा सर्वसाधारण असला तरी फारसा फरक पडत नाही. कारण संस्कारांचे मूल्य हा वेगळ्या स्तरावरचा बाज आहे. माणसाचे जीवन उन्नत करण्यासाठी गुरूकिल्ली आहे.

या पुस्तकातील साऱ्या गोष्टी सरळ आपले उद्दिष्ट सांगणाऱ्या, मोठ्या माणसांचे मोठेपण व त्यांच्याठायी असलेल्या तेजाची ओळख करून देणाऱ्या आणि म्हणूनच विलोभनीय आहेत.

प्रयत्न छानच आहे. प्रतिसाद वाढो व अनेकांचे जीवन


।। अल्पारंभ: क्षेमकर: ।।

SINGLE WINDOW SERVICES

खाजगी वितरणासाठी

Comrehensive Financial Consultancy & Services

सर्वसमावेशक आर्थिक सल्लागार

-:Head Office :
3,4, Kamal Residency, Behind Patil Lane No.4,
College Road, Nashik - 422 005.
Ph.: (0253) 2579993, 2317867, 2309480.
Website : www.singlewindowservices.com

-: Indira Nagar :-
Sandeep Deshmukh
Mobile : 9822408093

-: Indore Branch :-
Amlendu Sharma
Mobile : 9826211439

-: Jalgaon Branch :-
Deepak Kulkarni
Mobile : 9881242210

-:Chalisgaon Branch :-
Sachin Purkar
Mobile : 9373900533 /9226174249